REVIEW OF RESEARCH
ISSN: 2249-894X
IMPACT FACTOR : 5.7631(UIF)
VOLUME - 14 | ISSUE - 7 | APRIL - 2025

# सोलापूर जिल्ह्यातील बिडी कामगारांच्या आर्थिक व सामाजिक समस्यांचा अभ्यास

सा. प्रा. सपना बिराजदार
संशोधक विद्यार्थीनी
प्रा. रामकृष्ण मोरे महाविद्यालय, आकुर्डी, पुणे.

डॉ. अरविंद शेलार
संशोधक मार्गदर्शक
प्रभारी प्राचार्य
श्री. सिद्धीविनायक महिला महाविद्यालय, कर्वेनगर , पुणे.

**प्रस्तावना :**



भारतात बिडी उद्योग हा प्रामुख्याने असंघटित आहे. भारतात बिडी कामगारांचे हित आणि नोकऱ्या जपण्यासाठी कर सवलतीचा उपयोग होत आहे. भारतातील बिडी उद्योगातील कामगार हे इतर औद्योगिक व्यवसायातील कामगारांपेक्षा कमी पैसे कमावतात. भारतामध्ये स्वतंत्रपूर्व काळात बिडी उद्योगाला सुरुवात झाली. बिडी उद्योगातील कामगार हा असंघटित क्षेत्रातील आहे. भारतात ग्रामीण आणि शहरी भागात बिडी उद्योगाचा विस्तार हा मोठ्या प्रमाणात झालेला आहे. बिडी कामगारांचे अनेक प्रश्न आहेत. ते प्रश्न सोडवण्यासाठी अनेक कामगार संघटनांचा उदय हा झालेला आहे. बिडी कामगार चळवळ ही एक जागृत आणि संघर्षशील परंपरा असलेली चळवळ आहे. भारताच्या कामगार चळवळीमध्ये बिडी कामगार चळवळीचे वेगळे असे स्थान आहे. या बिडी कामगार चळवळीचे नेतृत्व करणाऱ्या नेतृत्वांनी देशाच्या आणि महाराष्ट्राच्या राजकीय, सामाजिक, सांस्कृतिक क्षेत्रामध्ये महत्त्वाची भूमिका पार पाडली आहे.

सोलापूर जिल्ह्यातील बिडी उद्योग हा महत्त्वाचा उद्योग आहे. सोलापूर हे महाराष्ट्रातील सर्वांत जास्त संख्येने बिडी कामगारांचे घर आहे. सोलापूरमधील शहरी आणि ग्रामीण भागात बिडी उद्योगाचा विस्तार मोठ्या प्रमाणात झालेला आहे. सोलापूर जिल्ह्यात २६ बिडी कारखान्यांचे ११५ युनिटस् आहेत. या युनिटमध्ये ७५२५५ कामगार आणि १७२५ कारखाना कामगार आहेत. जिल्ह्यातील बिडी उद्योगात ९५% महिला कामगार आहेत. हा उद्योग मुळात गृहउद्योग आहे. त्यामुळे जिल्ह्यातील बिडी उद्योगात महिला कामगारांची संख्या जास्त आहे. बिडी हा स्थानिक सिगारेटचा एक प्रकार आहे. तो तेंदूच्या पानात गुंडाळून

आणि शेवटी रंगीत धाग्याने बांधून बनवला जातो. बिडी उद्योगाचे काम हे कुटीर उद्योगाच्या श्रेणीत येते. त्यामुळे हे काम घरी बसून देखील केले जाते. जिल्ह्यातील कामगारांचे प्रश्न सोडविण्यासाठी कामगार संघटनांचा उदय झालेला आहे. या कामगार संघटनांनी कामगारांना संघटित करून कामागरांच्या न्याय हक्कासाठी संघर्ष केला आहे.

**बिडी कामगारांची पार्श्वभूमी :**

१७ व्या शतकाच्या उत्तरार्धात बिडी उद्योगाचा शोध लागला. १७ व्या शतकाच्या उत्तरार्धात भारतीय बिडी उद्योगाची झपाट्याने वाढ झालेली आहे. तंबाखू लागवडीच्या विस्तारामुळे आणि भारतीय उत्पादनांना मिळालेल्या पाठिंब्यामुळे बिडी उद्योगाला त्या काळात चालना मिळालेली आहे. आणि तेव्हापासूनच भारतातील शिक्षित वर्ग सिगारेटपेक्षा बिडीला प्राधान्य देऊ लागला आहे. २० व्या शतकाच्या मध्यापर्यंत बिडी उत्पादन हा अत्यंत स्पर्धात्मक उद्योग म्हणून विकसित झालेला आहे.

कामगार चळवळीच्या इतिहासात १५ फेब्रुवारी १९६९ ही एक संस्मरणीय तारीख आहे. केरळच्या मलबार प्रदेशातील कन्नूर या लहान शहरामध्ये केरळ दिनेश बिडी कामगार सहकारी संस्थेचे उत्पादन सर्वप्रथम सुरू झाले. केडीबी कामगार सहकारी संस्था विकेंद्रीकरणाविरुद्धच्या संघर्षाच्या पार्श्वभूमीतून आणि मलबार प्रदेशातून कमी किंमतीच्या भागात बिडी उत्पादन स्थलांतरीत झाल्याच्या पार्श्वभूमीवर उदयास आली. औद्यागिक लोकशाहीमध्ये केडीबी चा एक अनुकरणीय ट्रॅक रेकॉर्ड आहे.

१९६६ मध्ये ज्येष्ठ कम्युनिष्ठ आणि कामगार संघटनेचे नेते ए. के. गोपालन यांच्या नेतृत्वाखाली मध्यप्रदेशातील बिडी कामगारांच्या सततच्या संघर्षामुळे केंद्र सरकारने बिडी आणि सिगार कामगारांच्या रोजगाराच्या शर्ती कायदा संमत केला. १९६७ मध्ये सत्तेवर असलेल्या केरळमधील कम्युनिष्ठ सरकारने कायद्यातील कल्याणकारी तरतुदी लागू करण्याची आणि बिडी कामगारांना पाठिंबा देण्याच्या दृढ वचनबद्धतेमुळे खाजगी मालकीच्या बिडी उत्पादन युनिटस्ना कर्नाटकात मोठ्या प्रमाणात स्थलांतरीत केले. यामध्ये मंगळूरु गणेश बिडी या प्रदेशातील प्रमुख फर्मचे सर्व उत्पादन ऑपरेशन्स बंद झाल्यामुळे १२००० हुन अधिक कामगार बेरोजगार झाले. या संकटावर मात करण्यासाठी कम्युनिष्ठ पक्षाच्या नेतृत्वाखालील कामगारांनी प्रत्येक बेरोजगार कामगाराकडून १ रूपये जमा करून केरळ दिनेश बिडी कामगार सहकारी संस्था स्थापन केली. जी फेब्रुवारी १९६९ मध्ये अस्तित्वात आली.

१४४०, १९५० आणि १९६० च्या दशकात वाढलेल्या नियमाच्या परिणामी कारखाना-आधारित बिडी उत्पादनात घट झाली आणि बिडी बनवणे हा एक कुटीर उद्योग बनला आणि तेव्हापासून भारतात बिडी उद्योगाची उत्क्रांती झालेली दिसून येते.

**व्याख्या : उद्योग :**

उद्योग ही एक व्यापक श्रेणी आहे. ज्यामध्ये समान क्रियांमध्ये गुंतलेले किंवा संरक्षित वस्तू आणि सेवांचे उत्पादन करणारे सर्व व्यवसाय सामाजिक असतात. उद्योगांमध्ये उत्पादन संधान नैसर्गिक साधनसामग्रीवर प्रक्रिया करून उपभोग्य किंवा पुढील उत्पादन प्रक्रियेस उपयुक्त अशा एकाच प्रकारचा माल निर्माण केला जातो.

**१) प्रा. राईट :**

यांच्ये मते, उद्योग हा समाजाचा त्या आर्थिक क्रियांचा भाग आहे. ज्याद्वारे कच्चा मालाला आर्थिक माल अर्थात मौखिक मूल्यावर विक्री करणे, योग्य मालाला प्राप्त केला जातो. यात कृषी आणि निस्सारक उद्योग तसेच निर्माणी आणि रचनात्मक उद्योग सम्मिलित आहे.

२) उद्योग म्हणजे अर्थव्यवस्थेवर आधारित खरेदी-विक्री करता येईल अशा मालाची/वस्तूंची निर्मिती करणे, तसेच सेवा देणे होय.

**सोलापूर जिल्ह्यातील बिडी कामगारांची सद्यस्थिती :**

सोलापूर जिल्ह्यातील बिडी उद्योग हा महत्त्वाचा उद्योग आहे. सोलापूर हे महाराष्ट्रातील सर्वांत जास्त संख्येने बिडी कामगारांचे घर आहे. सोलापूरमधील शहरी आणि ग्रामीण भागात बिडी उद्योगाचा विस्तार मोठ्या प्रमाणात झालेला आहे. सोलापूर जिल्ह्यात २६ बिडी कारखान्यांचे ११५ युनिटस् आहेत. या युनिटमध्ये ७५२५५ कामगार आणि १७२५ कारखाना कामगार आहेत. जिल्ह्यातील बिडी उद्योगात ९५% महिला कामगार आहेत. हा उद्योग मुळात गृहउद्योग आहे. त्यामुळे जिल्ह्यातील बिडी उद्योगात महिला कामगारांची संख्या जास्त आहे. बिडी हा स्थानिक सिगारेटचा एक प्रकार आहे. तो तेंदूच्या पानात गुंडाळून आणि शेवटी रंगीत धाग्याने बांधून बनवला जातो. बिडी उद्योगाचे काम हे कुटीर उद्योगाच्या श्रेणीत येते. त्यामुळे हे काम घरी बसून देखील केले जाते. जिल्ह्यातील कामगारांचे प्रश्न सोडविण्यासाठी कामगार संघटनांचा उदय झालेला आहे. या कामगार संघटनांनी कामगारांना संघटित करून कामागरांच्या न्याय हक्कासाठी संघर्ष केला आहे.

सोलापूर जिल्ह्यातील बिडी उद्योग हा स्पर्धात्मक उद्योग बनला आहे. व्यावसायिक उत्पादनाच्या या टप्प्यावर बिडीच्या लोकप्रियतेच्या शिखरावर अनेक नवीन बिडी ब्रँडची निर्मिती झालो. सोलापूरात बिडी व कापड उद्योगांचे शहर म्हणून ओळखले जाते. हे शहर भारतातील मुख्य अशा उत्तर-दक्षिण रेल्वे मार्गावर असल्याने जिल्ह्यातील बिडी उद्योगात महत्त्व प्राप्त झालेला आहे. बिडी उत्पादनात सोलापूरचा महाराष्ट्र राज्यात वरचा क्रमांक आहे. सोलापूर जिल्ह्यात राष्ट्रीय बिडी मजदूर संघ, लाल बावटा बिडी कामगार संघटना, सोलापूर बिडी कामगार संघटना, बिडी आणि पॉवरलूम कामगार सेना या चार युनियन बिडी कामगारांच्या कल्याणासाठी काम करीत आहेत.

**तक्ता क्र. १.१ सोलापूर जिल्ह्यातील बिडी कामगारांची संख्या (२०२१-२२)**

| अ. क्र. | बिडीचा प्रकार | पुरुष कामगार | स्त्री कामगार | एकूण |
|---|---|---|---|---|
| १. | देसाई बिडी | ४५ | २८५० | २८९५ |
| २. | संभाजी बिडी | ६३ | ३४२० | ३४८३ |
| ३. | शिवाजी बिडी | ५० | ३४५० | ३५०० |
| ४. | ठाकूर सवदेकर बिडी | ७५ | ३६५८ | ३५३३ |
| ५. | बत्तीम बिडी | ४८ | २६५० | २६९८ |
| ६. | किरण ठाकूर बिडी | ६८ | ४५०० | ४५६८ |
| ७. | अप्पा ठाकूर बिडी | ५४ | ३२३० | ३२८४ |

| | | | | |
|---|---|---|---|---|
| ८. | चरभाई बिडी | ७२ | ३५३८ | ३६१० |
| ९. | मोहिनी बिडी | ४० | १८३० | १८७० |
| १०. | गुजरात बिडी | ४८ | ३६०० | ३६४८ |
| ११. | शंकरलाल बिडी | ५९ | २१५० | २२०९ |
| १२. | कोंबडा बिडी | ६५ | २२४५ | २३१० |
| १३. | जोशी बिडी | ६० | २२५० | २३१० |
| १४. | साबळे वाघिरे बिडी | ६५ | ४५६० | ४६२५ |
| १५. | भिकूसा बिडी | ५८ | ३५३० | ३५८८ |
| १६. | रंगृतम बिडी | ६० | ४५२० | ४५८० |
| १७. | चंद्रतारा बिडी | ३८ | २०५० | २०८८ |
| १८. | बॉब्बे बिडी | ६५ | ३८४० | ३९०५ |
| १९. | जयराम बिडी | ६५ | ३८५० | ३९१५ |
| २०. | लतिम बिडी | ५३ | ३०८० | ३१३५ |
| २१. | सिन्नर बिडी | २२ | १८५० | १८७२ |
| २२. | मुनरेय बिडी | ६२ | ३३५६ | ३४१८ |
| २३. | सोहेल बिडी | ४५ | १५०० | १५४५ |
| २४. | ऊथ बिडी | १२ | ६५० | ६६२ |
| २५. | रेवानसिद्धेश्वर बिडी | २१ | ११३५ | ११५६ |
| २६. | मोमिन बिडी | १४ | ८३६ | ८५० |
| | **एकूण** | **१३२७** | **७३९२८** | **७५२५५** |

संदर्भ: टी. जी. घाटगे, सोलापूर जिल्ह्यातील बिडी कामगार, संशोधन पेपर, ISSN No. 2349-628X, Jan, 2018, pp. 281.

वरील तक्ता क्र. १.१ मध्ये सोलापूर जिल्ह्यातील बिडी कामगारांची संख्या दर्शविण्यात आलेली आहे. सोलापूर जिल्ह्यात देसाई बिडी, संभाजी बिडी, शिवाजी बिडी, ठाकूर सवदेकर बिडी, बत्तीम बिडी, किरण ठाकूर बिडी, अप्पा ठाकूर बिडी, चरभाई बिडी, मोहिनी बिडी, गुजरात बिडी, शंकरलाल बिडी, कोंबडा बिडी, जोशी बिडी, साबळे वाघिरे बिडी, भिकूसा बिडी, रंगूतम बिडी, चंद्रतारा बिडी, बॉब्बे बिडी, जयराम बिडी, लतिम बिडी, सिन्नर बिडी, मुनरेय बिडी, सोहेल बिडी, ऊंथ बिडी, रेवानसिद्धेश्वर बिडी, मोमिन बिडी हे उद्योगाचे प्रकार आहेत. सोलापूर जिल्ह्यात २०२१-२२ या वर्षात एकूण बिडी कामगारांची संख्या ७५२५५ एवढी असून या संख्यात पुरुष कामगारांची संख्या १३२७ व स्त्री कामगारांची संख्या ७३९२८ एवढी आहे. २०२१-२२ या वर्षात सर्वांत जास्त बिडी कामगारांची संख्या साबडे वाघिरे बिडी (४६२५), किरण ठाकूर बिडी (४५६८), जयराम बिडी (३९१५), बॉब्वे बिडी (३९०५), लतिम बिडी (३९०५), गुजरात बिडी (३६४८), चरभाई बिडी (३६१०), भिकूसा बिडी (३५८८), ठाकूर सबदेकर बिडी (३५३३), या बिडी उद्योगांचा क्रमांक लागतो. तर सोलापूर जिल्ह्यात सर्वांत कमी बिडी कामगारांची संख्या ऊंथ बिड (६६२) उद्योगात आहे.

## संशोधन विषयाची उद्दिष्टये :

१) महाराष्ट्राच्या अर्थव्यवस्थेत बिडी उद्योगाचे महत्त्व अभ्यासणे.

२) महाराष्ट्रातील बिडी उद्योगाच्या प्रगतीचा आढावा घेणे.

३) सोलापूर जिल्ह्यातील बिडी उद्योगातील कामगारांच्या आर्थिक व सामाजिक समस्यांचा अभ्यास करणे,

४) कामगार समस्या सोडवणुकीसाठी कामगार संघटनांच्या भूमिकेचा अभ्यास करणे.

५) सोलापूर जिल्ह्यातील बिडी उद्योगातील कामगारांच्या आर्थिक व सामाजिक समस्यांवर उपाययोजना सुचविणे.

६) बिडी उद्योगामुळे सोलापूर जिल्ह्यातील उत्पन्न व रोजगार स्थितीत झालेल्या बदलांचा अभ्यास करणे.

## संशोधन विषयाची गृहितके :

१) बिडी उद्योगामुळे सोलापूर जिल्ह्यातील बिडी या उद्योगातील कामगारांच्या आर्थिक व सामाजिक समस्यांचा प्रभाव कमी झालेला आहे.

२) बिडी उद्योगातील कामगारांच्या समस्या सोडविण्यात संघटनांची भूमिका उपयुक्त आहे.

## नमुना निवड पद्धती :

सोलापूर जिल्ह्यातील बिडी उद्योगातील कामगारांची अभ्यासासाठी निवड करण्यात आलेली आहे. प्रस्तुत अभ्यासासाठी सोलापूर तालुक्यातील ज्या बिडी उद्योगात कामगारांची संख्या जास्त अशा बिडी उद्योगांची प्रातिनिधीक स्वरुपात निवड करण्यात आलेली आहे.

**तक्ता क्र. १.२ नमुना निवडीसाठी निवडलेले बिडीचे प्रकार व कामगार संख्या**

| अ. क्र. | बिडीचा प्रकार | एकूण कामगारांची संख्या | नमुना निवडीसाठी निवडलेल्या कामगारांच संख्या (२%) |
|---|---|---|---|
| १ | साबळे वाघिरे बिडी | ४६२५ | ९२ |
| २ | रगूतम बिडी | ४५८० | ९१ |
| ३ | किरण ठाकूर बिडी | ४५६८ | ९१ |
| ४ | जयराम बिडी | ३९१५ | ७८ |
| ५ | बॉम्बे बिडी | ३९०५ | ७८ |
| ६ | लतिफ बोडी | ३९०५ | ७८ |
| ७ | गुजरात बिडी | ३६४८ | ७३ |
| ८ | चरभाई बिडी | ३६१० | ७२ |
| ९ | भिकूसा बिडी | ३५८८ | ७२ |
| १० | ठाकूर सबदेकर बीड़ी | ३५३३ | ७१ |
|  | एकूण | ३९८७७ | ७९७ |

संदर्भ: तक्ता क्र. १.१

वरील तक्ता क्र. १.२ मध्ये अभ्यासासासठी निवडलेले बिडीचे प्रकार व नमुना निवडीसाठी निवडलेल्या कामगारांची संख्या दर्शविण्यात आलेली आहे. सोलापूर जिल्ह्यातील त्या बिडी उद्योगात सर्वांत जास्त कामगारांची संख्या आहे असे १० बिडी प्रकार अभ्यासासाठी निवडलेले आहेत. सोलापूर जिल्ह्यात सर्वांत जास्त साबळे वाघिरे बिडी (४६२५) उद्योगात कामगारांची संख्या आहे. त्यानंतर रगूतम बिडी (४५८०), किरण ठाकूण बिडी (४५६८), जयराम बिडी (३९१५), बॉम्बे बिडी (३९०५), लतिफ बिडी (३९०५), गुजरात बिडी (३६४८), या उद्योगात आहे. सोलापूर जिल्ह्यातील १० बिडी उद्योगांमध्ये ३९८७७ एवढे कामगार आहेत. या ३९८७७ संख्येपैकी २% म्हणजे ७९७ कामगारांची संशोधनासाठी निवड करण्यात आलेली आहे. सोलापूर जिल्ह्यातील एकूण २६ बिडी उद्योगातील कामगारांची एकूण संख्या ७५२५५ एवढी असून यापैकी १० बिडी उद्योगातील कामगारांची संक्या ३९८७७ एवढी आहे. ही संख्या एकूण २६ बीड़ी उद्योगातील कामगार संख्येच्या ५२.९८% आहे.

## दुय्यम सामग्री :

भारत सरकार, भारताची आर्थिक व सामाजिक पाहणी, महाराष्ट्र शासन, महाराष्ट्राची आर्थिक व सामाजिक पाहणी, सोलापूर जिल्हा आर्थिक व सामाजिक समालोचन, भारतीय जनगणना अहवाल, वर्तमानपत्रातील विविध अग्रलेख, जागतिक विकास अहवाल, संशोधन प्रबंध, मासिके, वेबसाईट संशोधन पत्रिका, भारतीय सांख्यिकीय विभागाचा अहवाल, विविध कार्यशाळेतील माहिती पुस्तिका, विविध शासनाच्या माहिती पुस्तिका, अहिल्यादेवी होळकर, सोलापूर विद्यापीठाचे ग्रंथालय, गोखले इन्स्टिट्यूट पुणे, भारतीय शिक्षण संस्था, यशदा ग्रंथालय पुणे इत्यादी दुय्यम साधनांचा संशोधनासाठी वापर करण्यात आलेला आहे.

## संदर्भ साहित्याचा आढावा

### १. पांडे राजू (२०२०) :

यांनी 'महाराष्ट्रातील संगमनेर, अकोले, सिन्नर तालुक्यातील बिडी कामगार चळवळीचा चिकित्सक आढावा' या विषयावर संशोधन पेपर प्रकाशित केलेला आहे. भारतामध्ये स्वातंत्र्यपूर्व काळात बिडी उद्योगाला सुरवात झाली. बिडी उद्योगातील कामगार हा असंघटित क्षेत्रातील आहे. ग्रामीण व शहरी भागात बिडी उद्योगाचा विस्तार मोठ्या प्रमाणात झाला. अहमदनगर जिल्ह्यातील संगमनेर अकोले तालुक्यात नेहमीच दुष्काळाची परिस्थिती होत असते. येथील शेती जिरायती असल्याने मुख्यतः पावसाच्या पाण्यावर अवलंबून आहे. या तालुक्यात पावसाचे प्रमाण कमी, नेहमीच दुष्काळाची स्थिती असते. अशा भौगोलिक परिस्थितीमुळे शेतीला पूरक म्हणून बिडी उद्योगाची सुरवात झाली. शेतीला पर्यायी उपजिविकेचे साधन म्हणून लोक या व्यवसायांकडे आकर्षित झाले आहेत. स्वातंत्र्यपूर्व काळात निर्माण झालेला बिडी व्यवसाय संगमनेर, अकोले, सिन्नर तालुक्यात विकसित झालेला आहे. ग्रामीण भागात शेतीला पर्यायी उपजिविकेचे प्रमुख साधन म्हणून बिडी व्यावसाय विस्तारत गेला आहे. त्यामधून बिडी कामगारांची संख्या वाढत गेली आहे. स्वातंत्र्यपूर्व काळात महाराष्ट्राच्या अवर्षणग्रस्त भागात बिडी व्यवसायाला अनुकूल अशी परिस्थिती निर्माण झाली म्हणून या भागात बिडी व्यवसायाची सुरवात झालेली आहे.

### २. अवचट अनिल (२०१०) :

लेखकाने 'माणस' या पुस्तकातून सर्वप्रकारच्या दलित, पिडीत, शोषित जीवन जगणाऱ्या माणसांचा आढावा घेतलेला आहे. ग्रामीण भागातील कामगारांकडून मोठ्या प्रमाणात काम करून घेतलेल्यामुळे निपाणीतील बिडी कामगारांमध्ये चिंतेचे

वातावरण निर्माण झालेले आहे. देवचंद शहा कॉलेज मध्ये प्राध्यापक म्हणून काम करणाऱ्या प्रा. जोशी यांनी या प्रश्नाला वाचा फोडली त्यामुळे महाविद्यालयातील प्रमुखांनी त्यांना त्यांच्या पदावरून हकालपट्टी केली.

परंतु प्रा. जोशी यांच्या बाजूने महाविद्यालयातील सर्व विद्यार्थी सरांच्या बाजूने उभे राहिल्याने संस्थेला पुन्हा त्यांना कामावर रुजू करून घ्यावे लागले. लेखकाने आपल्या पुस्तकात प्रा. जोशी यांनी बिडी कामगारांसाठी केलेला संघर्ष उल्लेखनीय आहे असे म्हटले आहे. लेखकाने अंधेर नगरी-निपाणी या उपप्रकरणातून निपाणीमधील सर्व पैसा आणि सत्ता ही तंबाखू व्यापारी बिडी उत्पादकांकडेच केंद्रित होती. याचे दर्शन आपल्या पुस्तकात घडवून आणले आहे. बिडी कारखानदार शेतकऱ्यांकडून तंबाखू विकत घेत, त्यांच्यापासून बिड्या तयार करून बिडी उत्पादकांना विकतात. त्यामुळे बिडी कारखानदार आणि उत्पादकच नव्हेत तर एजंटस् हे देखील श्रीमंत बनत गेले. या लोकांच्या हातात सर्व पैसा आणि सत्ता हातात होती. हे लोक फक्त कामगारांचीच पिळवणूक करीत असत. लेखकाने स्त्री बिडी कामगारांच्या शारीरिक, लैंगिक छळांचे विदारक चित्रण 'माणसे' या पुस्तकातील अंधेर नगरी निपाणी या उपप्रकरणातून केली आहे. बिडी कामगारांनी कामगार संघटनांशी थोडा जरी संवाद साधला तर त्या कामगारांना काहीही न बोलता कामावरून कमी केले जात असे, असे लेखकाने म्हटले आहे. थोडक्यात लेखकाने निपाणीत या बिडी कामगारांची असणारी दयनीय स्थितीचे विदारक चित्रण आपल्या 'माणसे' या पुस्तकातून रेखाटले आहे.

### ३. सेन विनोद (२०११) :

यांनी 'Impact of Social Security Schems & Welfare Programmes on Bidi Rollers' या विषयावर संशोधन लेख प्रकाशित केलेला आहे. लेखकाने या लेखात २०११ मध्ये मध्यप्रदेश येथील सागर बिडी उद्योग राजनंदन गाव जिल्हा बत्तीसगड येथील बिडी कामगारांचा अभ्यास करताना बिडी कामगारांच्या सामाजिक सुरक्षितता योजना आणि कल्याणकारी योजना यासबंधी कामगारांसाठी असलेला १९७६ चा बिडी कामगार कल्याण कायदा कसा अपयशी ठरला याचे विवेचन करण्यात आलेले आहे. बिडी उद्योगात काम करणाऱ्या महिला कामगारांना दिल्या जाणाऱ्या वैद्यकीय सुविधा, विमा, पगार, पेन्शन, शिष्यवृत्ती शिक्षण अशा अनेक सोयी सुविधा कामगारांना मिळत नाहीत. या लेखात लेखकाने असे म्हटले आहे की, २० टक्के कामगारांना वैद्यकीय सुविधा, २ टक्के कामगारांता बोनस, ६ टक्के कामगारांच्या मुलांना शिष्यवृत्ती सुविधा मिळतात. बिडी उद्योगातील कामगार उद्योगात जास्त वेळ काम करीत असतात. त्यामुळे जास्त वेळेपर्यंत काम केल्यामुळे कामगारांच्या आरोग्यावर परिणाम होत असल्याचे दिसून येत आहे. तसेच ९२.५ टक्के कामगार हे सहा ते सात महिन्यातच आजारी पडल्याचे पहावयास दिसून येत आहे. लेखकाने संशोधनाच्या शेवटी असा निष्कर्ष काढला आहे की, कामगारांच्या अज्ञानामुळे त्यांना सामाजिक सुरक्षितता आणि कल्याणकारी योजनांचे फायदे मिळत नाहीत, असा निष्कर्ष काढलेला आहे.

### ४. सरकार सिद्धार्थ (२००४) :

यांनी 'Women Beedi Workers in Beedi Roling' या विषयावर मासिकात लेख प्रकाशित केला. लेखकाने या लेखात बिडी उद्योगात काम करणाऱ्या कामगारांचा अभ्यास केलेला आहे. आज शासनाने बिडी कामगारांसाठी अनेक योजना, सवलती, तरतुदी केल्या असल्या तरी बिडी कामगारांना अनेक समस्यांना सामोरे जावे लागत आहे. बिडी कामगार कारखान्यात काम करीत असताना त्यांना प्रचलित वेतनदरावर काम मिळत नाही. अतिशय तुटपुंज्या वेतनावर त्यांना काम करावे लागते, शासनाने या कामगारांसाठी किमान वेतन कायद्याची अंमलबजावणी केलेली नाही. तसेच या कामगारांना कोणत्याही प्रकारची सामाजिक सुरक्षितता प्राप्त होत नाही. त्या वेळी कामगारांची भरती केली जाते. तेव्हा शिक्षणाचा निकष न लावता मध्यस्थ किंवा

नोकरांच्या मार्फत कामगारांची भरती केली जाते. बहुतेक ठिकाणी या मध्यस्थांकडून या कामगारांना मालाचा पुरवठा केला जातो. कधी कधी खराब माल या मध्यस्थांनी पुरविला तर या बिडी कामगारांना स्वतःच्या पैशातून पुनः मालाची खरेदी करावी लागते. बिहारमध्ये बिडी कारखान्यांची संख्या जास्त आहे. या प्रत्येक बिडी कारखान्यात कामगारांना वेगवेगळ्या दराने वेतन दिले जाते. बिहारमध्ये बिडी कारखान्यात जास्त प्रमाणात बालकामगार काम करीत असलेले दिसून येतात. या कामगारांचे वयाचे प्रमाण हे वेगवेगळे असलेले दिसून येते. बिहारमधील स्त्री-पुरुष आपल्या कुटुंबांच्या आर्थिक गरजा भागवण्यासाठी तसेच आपला उदरनिर्वाह करण्यासाठी बिडी कारखान्यातील जे बालमजूर आहेत ते बालमजूर आपल्या शिक्षणाच्या गरजा भागविण्यासाठी मजूरी करीत असलेले दिसून येतात.

## संदर्भ सूची :

१ ) वेबसाईट: http://en.m.wikipedia.org/wiki/Beedi

२) भारतीय कामगार (ECO 263) प्रकाशक, यशवंतराव चव्हाण महाराष्ट्र मुक्त विद्यापीठ, वर्ष २००१, पृ. क्र. ७२.

३) C.SLR. The wealth or India, Induistrial Products Parts I and IV, Delhi and New Delhi, 1948 and 1976.

४) वेबसाईट: http://vishwakosh.marathi.gov.in

५) शिरसाट सतीश, असंघटित कामगार, सावित्रीबाई फुले पुणे विद्यापीठ, प्रौढ निरंतर शिक्षण व ज्ञान विस्तार विभाग, पुणे विद्यापीठ, पुणे-०७, माणिक जाधव मुद्रक व प्रकाशक, द्वितीय आवृत्ती, २०१०, पृ.क्र. ०७.

६) वेबसाईट: http://www.bajajfinserv.in

७) वेबसाईट: http://socialwelfare.vikaspedia.in

८) वेबसाईट: http://www.gkesams.com

९) वेबसाईट: http://mr. wikiepedia.org

१०) महाराष्ट्राची आर्थिक पाहणी, २०२३-२४, पृ. क्र. १५६, १५७.

११) महाराष्ट्राची आर्थिक पाहणी, २०२३-२४, पृ. क्र. १५७.

१२) वेबसाईट: http://www.chinimandi.com.

१३) टी. जी. घाटगे, सोलापूर जिल्ह्यातील महिला बिडी कामगार संशोधन पेपर, ISSN No. 2349-638X, Jan, 2018, पृ. क्र. २८१.

१४) पांडे राजू, महाराष्ट्रातील संगमनेर, अकोले, सिन्नर तालुक्यातील बिडी कामगार चळवळीचा चिकित्सक आढावा, Anekant Journal of Humanities and Socia Science, Paper, Vol-III, Issue 1, August 2020, पृ.क्र.१,२,५०

१५) अवचट अनिल, 'माणस', मौजे प्रकाशन, गिरगाव, मुंबई, बारावी आवृत्ती, २०१०.

१६) सेन विनोद, Impact of Social Security Schems & Welfare Programmes on Bidi Rollers' सामाजिक एकसंघता आणि विकास संशोधन लेख, नवी दिल्ली, २०११, पृ. क्र. १४५

१७) सरकार सिद्धार्थ, 'Women Beedi Workers in Beedi Roling' The Indian Journal of Economics Vol no. 47, pp. 4 4.